ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# ''मराठी लोकसाहित्यातील निवडक लोककला''

**प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते**
मराठी विभाग प्रमुख
श्री गुरू बुध्दीस्वामी महाविद्यालय,वर्धा (जं) परभणी

★★★

**सारांश** :– प्राचीन लोकजीवनाचा अभ्यास करताना लोक साहित्याचे अध्ययन उपयुक्त ठरते. लोकसाहित्याचा व लोकसंस्कृतीचा अभ्यास अनेक अगनी झाला पाहिजे. कारण आजच्या समाजजीवनात इहवाद, दैववाद व यातूप्रधान श्रध्दा या सर्वांचे समिश्र स्वरूप दिसते. मौखिक परंपरेव्यतिरिक्तही लोकसाहित्याची साधनसाम्रगी मोठया प्रमाणात असते. जसजसा काळ बदलला तस तसे सादरीकरणाचे स्वरूपही बदलले. काही विधी धर्मिक प्रेरणेतुन केले जात असले, तरी त्यामाची मनोरंजनाची प्रेरणाही प्रबळ होत आहे. धर्मश्रेतून साकार होणा–या विधीनाटयांचे परिरवर्तन पुढे लोकनाटयात झाले आहे. आधुनिकतेच्या रेटयामुळे लोकनाटयांत बदल घडून येत आहेत. कीर्तन,भारूडासारखे काही पारंपारिक नाटयात्म प्रकार मा. लोकरंजनाबरोबर लोकप्रिय प्रभावी माध्यम ठरत आहेत.

पाश्चिमात्य संस्कृतीच्या अतिक्रमणामुळे लोककला लोप पावत चालली आहे. आजची परिस्थिती पाहता, मनोरंजनाची गरज भागवण्यासाठी मल्टिप्लेक्स, दुर त्याचबरोबर कम्प्युटर, मोबाईल आदि साधने उपलब्ध आहेत. हे सगळं सोडून रस्त्यावरच्या किंवा मंदिरातल्या लोककला पहाण्यासाठी कोणीही तयार नाही त्यामुळे लोककला जपल्या जात नाहीत आणि याच कारणाने लोककलावंतांना मिळेल ते काम करून पोट भराव लागतं. वृध्दपकाळात लोककलावंतांचे खूप हाल होतात. त्यामुळे लोककलावंत आता संपत चालले आहेत.

लोककला जगवायची असेल तर लोककलावंतांना जगवायला हवं, त्यांच्या कलेचे सादरीकरण आकाराची, दुरदर्शनवर व्हायला हवे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत लोककलावंतांसाठी व्यासपीठ निर्माण केले आहे. लोककलेचा अभ्यास, संशोधन आणि त्यांचे कल्याण अशा तीन पातळीवर विद्यापीठ काम करत आहे. अशा प्रकारे सर्वच विद्यापीठात हा प्रयोग होणे गरजेचे आहे. लोककलाकार जगलेतरच लोककला टिकेल उपाशी राहून कोणीही कलेचा अविश्कार करू शकत नाही. खेडोपाडी लोककलावंतांचे जाळे आहे. यचआयव्ही, ,ड्स जनजागृती', 'स्वच्छ भारत', अंधश्रध्दा निर्मुलन, भ्रष्टाचार, आरोग्य, भ्रुणहत्या, अत्याचार यावर आळा घालण्यासाठी स्थानिक लोककलाकराची ब्रॅड ॲबेस्डर म्हणून नियुक्ती करावी. यामुळे जनतेच्या कल्याणाची माहिती अधिक तळागाळापर्यत पोहोचवली जाईल, तसेच या आधारे लोककलांचे जतन आणि प्रसारही होईल.

बिजशब्द :– मराठी लोककसाहित्यात अनेक लोककला आहेत लावणी, तमाशा, कीर्तन, गोंधळ, ललित, पोतराज, दशावतार, वासुदेव, भारूड, बहूरूपी, वाघ्या .मुरळी, पिंगळा या लोककलांचा अभ्यास करणार आहे.

**प्रास्ताविक** :– लोकसाहित्याला फार प्राचीन परंपरा आहे. प्राचीन साहित्यात, धर्मग्रथातही लोकसाहित्याचे संदर्भ आढळतात. ब्रिटिश कन्या मिस मेरी फ्रियरने  शसक कमबवंद कंलेश हा संकलित पहिला लोककथासंग्रह प्रकाशित केला. त्याचे अनुवाद जर्मन, डॅनिश, हंगेरियन अशा यूरोपीय मेरीचे पुस्तक अनुवादीत केल्यामुळे मराठी लोककथा जगभर गाजल्या.राजाराम शामची भागवत हे महाराष्ट्रातील लोकसाहित्यासंबंधी  दृष्टीने लिहिणारे पहिले लेखक आहेत.

**लोकसाहित्याच्या व्याख्या .** जोनास बॅलिस : जोनास बॅलिस या अभ्यासकाच्या मते, ''लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून ते परंपरा प्राप्त असते. तसेच ते सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्या व्दारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककला प्रकार त्याच प्रमाणे नृत्ये–नाटय इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोक साहित्य हे लोक समूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे  आहे. लोकसाहित्य हे आदिमानवाची परंपरेने चालत आलेली निर्मिती आहे व ध्वनी आणि शब्द यांच्या रूपातून पद्य स्वरूप धारण करते ही महत्त्वाची गोष्ट त्यांनी सांगितली आहे.

**मारियस बार्डो** : त्यांच्या मते ''विविध व्यवसायाचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी, रूढी आणि व्यवहार या संबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने का पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. त्या सर्वास लोकसाहित्य म्हणावे'', असे म्हटले आहे''

**बी बॉटकिन** : ''आधुनिक समाजातील असे ज्ञान ज्यात परंपरेने ,का पिढीपासून दुस–या पिढीपर्यंत आलेल्या विधेशांचे आधिकत्व असते त्याला लोकसाहित्य म्हणता येईल.

**जॉर्ज म–फॉस्टर** : ''लोकसाहित्य हा शब्द लवचीक असून त्यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भावाविशकारांचा समावेश होतो''.

फॉस्टर यांनी लोकसाहित्याचे स्वरूप हे त्याच्या वाङ्:यीन विधेशांवरून निश्चित न करता लोकांच्या अविष्कारा पतीच्या विविध पती आणि रूपबंधांचा समावेश लोकसाहित्यात होतो. ही व्यापक व्याख्या स्वीकारल्यामुळे लोकसाहित्याच्या संचिताच्या माध

यमातून मानववं'ााचा इतिहास उलगडण्याची संधी अभ्यासकांना प्राप्त करून देते. डॉ. नागे– नांदापूरकर : लोकवाङ्मय म्हणजे लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय–''लोकसाहित्य हे मौखिक परंपरेने चालत आलेले असते त्याचबरोबर त्याचा कर्ता कोणीही नसतो.

**डॉ. प्रभाकर मांडे** : लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिकपरंपरा म्हणजे लोक साहित्य लोकसाहित्य लोकांचे असते. व्यक्तिचे कधीही नसते. ''परंपरागत आलेल्या मौखिकपरंपरा मग त्यात सर्वच ? घटक ग्रहय धरून लोकसाहित्याची व्याख्या केलेली आहे.

**डॉ. सरोजिनी बाबर** : ''विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासांनी शिरलेले व आणि कित्येक वर्धमार्ग रचले असताना पाठांतराच्या बळावर पिढयान् पिढया आपल्या नव नवोनमे शालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित कर.ाारे ते लोकसाहित्य लोकसाहित्य हे स्वरविलासांनी नटलेले आहे– तसेच पाठांतराच्या बळावर ,का पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले असते–

**डॉ. गिरी धर मोरजे** : ''लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाङ्मय प्रकार नाही उलट मौखिक आश्रय विधिसंबंधित कृती व अभिनय यांच्या केलेला प्रयोग असतो. म्हणजेच ही प्रयोग कला आहे.

समाजातील धार्मिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक या सर्वच महत्त्वाच्या घटकाचे दर्शन लोकसाहित्यातून होत असते असे म्हटले आहे आणि हाच खरा लोकसमूहाच्या मनाचा आविष्कार असतो.

**डॉ.रा.चिं.ढेरे** : ''लोकसाहित्ये हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे. हे खरेच परंतु लोकसाहित्येत्तर वाङ्मयीन सामुग्रीतून लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवाहाचे समग्र दर्शन घेता येते. विद्यमान लोकसाहित्य कालौशात नाहीसे झालेले असते. अनेक लोकाचाराचे प्रचलन थांबलेले असते. अनेकात बरीच परिवर्तन घडलेली असतात. मराठी लोकसाहित्यातील लोककला ''लोककलांची निर्मिती ही समूहमानसामधून होते– ईश्वरविषयक श्रध्दाभावना, धर्मकल्पना व सर्जक जाणिवा कलाविकारांस प्रवृत्त करीत असतात– व्यक्तित्व भावभावनांचे सामूहिकीकरण होत असते– लोककलाविकार हे मौखिक परंपरेनने चालत आलेली लोकसाहित्याची आहेत– लोककला या सामूहिक भावनांचे आविष्कार असल्या तरी प्रत्येक काळातील व्यक्ती त्यात भर घालीत असतात.

कलाविष्कार हा समूहमनाला आवाहन करणाराच असतो. लोककलांचे संक्रमण ,का पिढीकडून दुस–या पिढीकडे प्रवाहित होत असते. त्यामुळे लोककला परंपरा आणि परिवर्तन यांचा सुयोग्य मेळ साध् ातात– म्हणून लोककलांचे स्वरूप जितके पुरातन तितकेच नित्यनूतन राहते– लोककला आदि आणि प्राचीन परंपरेतून आल्या असल्या तरी त्यांच्या सद्यःकालीन आविष्कार हा ताजा, जिवंत आणि काळाचे भान राखणारा असतो.

**निवडक लोककला कीर्तन** – देवाची आराधना करण्याचे, भक्तीचे सुलभ साधन म्हणून प्राचीनकाळापासून कीर्तन प्रचलित आहे. परमेश्वर आणि थोर विभूतींचे तसेच पराक्रमाचे वर्णन करणारा लोककला प्रकार आहे. काव्य संगीत, अभिनय आणि काहीवेळा नृत्य यांच्या संगमातून सादर झालेले कथारूप ,कपाशी निवेदन म्हणजे कीर्तन कीर्तनामध्ये संगीत, नृत्य आणि नाटय या तिन्ही गोष्टींचा समावेश असतो. कीर्तन जणू ,कपाशी नाटयप्रयोग असतो. कीर्तनकार म्हणजे हरदासीबुवा बहुश्रुती, व्यासंगी रसिक असतो. उत्तम पाठांतर, संगीताचे ज्ञान त्याला असते.

**ललित** – ललित ही मराठमोळी लोककला आहे. कोकणात नारदीय कीर्तन परंपरेत ललिताचे महत्त्वाचे स्थान आहे. ललिताचा हेतू सोंगाच्या माध्यमातून तत्त्वज्ञान प्रेक्षकांच्या मनावर बिंबवणे हा असतो. या सोंगाच्या माध्यमातून करमणूक केली जाते. उत्सावाच्या शेवटी उत्सवदेवता सिंहासनावर बसली आहे, असे मानून तिच्या दरबारात विविध सोंगे आणली जातात. याला ललित म्हटले जाते. या सोंगांमध् ये भालदार, जोपदार,वासुदेव,गोंधळी, वाघ्या, मुरळी यांसारखी पात्रे असतात.

**तमाशा** – मराठी लोकसाहित्यातील अत्यंत महत्त्वाचा लोककला प्रकार म्हणजे तमाशा– तमाशातील फार्स आणि व नाटयातून प्रबोध् ानाचे, मनोरंजनाचे काम केले जाते. आज तमाशाचे स्वरुप पूर्णपणे बदलले आहे. पारंपारिकते बरोबरच नवस्वीकृती होत आहे. समाजाची अभिरूची बदलली आहे. तमाशाला रंजनमाध्यमांशी प्रकारची स्पर्धा करावी लागते आहे. त्यामूळे काळाच्या ओघात काही अपरिहार्य असले, तरी तमाशा हा मराठी लोकरंग भूमीवरचा रांगडा, अस्सल देशी आविष्कार आहे. या पुढील काळात तो किती तरी धरेल यांची चिंता वाटावी अशी परिस्थिती नक्कीच आहे. तमाशा आणि कलावंत यांच्यासाठी सरकारकडून प्रयत्न झालेले दिसतात. तमाशा कलावंतांसाठी पेन्शन योजना सुरू झालेली आहे. मात्र, अद्याप सर्वापर्यंत ही योजना पोहेचू शकलेली नाही. आज अनेक तमाशाचे फड बंद पडले आहेत. आणखी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

**गोंधळ** – महाराष्ट्रात गोंधळाला मोठी परंपरा आहे. लग्न समारंभ किंवा शुभ कार्यामध्ये गोंधळाचा कार्यक्रम केला जातो. कुलदेवतेला प्रसन्न करणा–यासाठी गोंधळ घालण्याची परंपरा सध्यातरी टिकून आहे. अंगत तेलकट झबला, गळयात देवींची प्रतिमा, कपाळावर कुंकू व भंडारा आणि गळयात कवडयांची माळ अशी वेशभूभा असलेली व्यक्ती म्हणजे गोंधळी संबळ आणि या वाद्य नृत्यही करणारा गोंधळी काकडे पेटवून देवीचे करत गोंधळ घालतो. शहरीकरणाचे दुष्परिणाम या परंपरेवर होत आहेत.

**लावणी** – गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा संगम असलेली लावणी हा लोकप्रिय कलाप्रकार आहे. तामाशाचा भाग म्हणूनही लावणी सादर केली जाते, आधारलेल्या लावणीचे मूळ संतांच्या विराण्या, गौळणी, बालक्रीडेचे अभंगात आढळून येते. शाहिरांनी या लावण्याची

लज्जत वाढवली. नव्हे, तर भक्तीरस, वीररस, वात्सल्यरस असलेल्या लावण्याही जाहिरांनी रचल्या आहेत. लावणी शिवाय मनोरंजनाच्या कार्यक्रमाला शोभा येत नाही. मात्र सध्याची लावणी आणि लावणीकलावंत यांची स्थिती दयनीय झाली आहे.

**दवतार** — कोकाणातील प्रामुख्याने सिंधुदुर्ग जिल्हयात असलेली दशावतार ही एक लोककला आहे. विणूने दहा आवतार धारा केल होते. तयामध्ये मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, पर'ुराम, राम, कृष्ण, कलंकी आणि बु) यांचा समावेश आहे. यातील पहिली चार प्राणीरूपे आहेत. कलंकी आणि हे दान आवतार दशावरतारात दाखवण्यात येत नाहीत. तुळशीच्या लग्नासून जत्रांमध्ये दशावतारी खेळ सुरू होतात. मे महिन्यापर्यंत हे खेळ चालतात.

**पोतराज** — पोतराज हा ग्रामीण भागात मंगळवारी व शुक्रवारी फेरी मारतो. हालगीच्या तााावर तो देवीची गाणी म्हणतो. कमरेला वेगवेगळया चोळी खाची रंगीत घागरा घातलेला असतो. ही लोककला फार पारंपारिक आहे. स्त्रींया ते जेव्हा गाणी म्हणत आपल्या दारी येतो तेव्हा त्याला घरातील धान्य देतात. त्याच्यावर तो आपला उदनिर्वाह करत असतो. काळाच्या ओघात ही कला सुध्दा बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

**वासुदेव** — सकाळच्या वेळी घरोघर हिंडून पांडुरंग आणि श्रीकृष्ण यांचे अभंग—गवळणी गात दान मागणारा लोक कलाकार आहे. पंढरपूर सारख्या ठिकाणी वासूदेव हा तीर्थयात्रात स्नान करायला आलेल्या मंडळींनी नाना तीथयात्रांची आणि तिथल्या देवतांची नावे सांगतो. त्या अर्थाने वासुदेव तीर्थाचा चालता बोलता कोशाच आहे. वासुदेवाला पैसे दिले तो सगळया दैवतांच्या नावाने पावती देतो, आणि मग अलगुज वाजवतो. वासुदेव सहसा कुणालाही आपणहून पैसे मागत नाही.

वासुदेव विशेषात्वाने कृशण कथा सादर करतो. डोक्यावर शंकुकार मोरपिसाची टोपी, पायात घुंगरू, हातात टाळ, अंगात घोळदार अंगरखा, कमरेला शेला, शेल्यात बासरी, काखेत झोळी असे सुंदर ध्यान सुरेल आवाजात गिरकी घेत नाचत भल्या पहाटे दारात नामघोश करत दान मागतो. ज्याच्या दारात भिक्षा मागायची असते तोच प्रेक्षक असतो. देवदेवतांच्या आख्याना बरोबर लौकिक आख्याने डाऊन,कशा प्रकारे तो त्या कुळूचा दान देणाराचा उच्चार करतो.

**भारूड** — भारूडातील विषय हे सर्वसामान्यांच्या परिचयाचे व नित्याच्या व्यवहारात वावरणारे व आढळणारे असतात. व्यवसाय, नाती, गोती, सामाजिक वृत्तिदर्शन, गाव, दैवी भूमिका, भुत, संत साहित्याच्या अभ्यासक काळुबाई जाधव, लक्ष्मीबाई गिरम आणि चंदाबाई तिवाडी या स्त्री भारूडकर्त्या भारूडे सादर करीत असता. चंदाबाई तिवाडी यांना तर संगीत नाटक अकादमीचा पुरस्कारही मिळाला आहे. आकाशवाणीवर आणि दुरचित्रवणीवर कार्यक्रम करण्यास त्यांना आमंत्रित केले जाते. विचू चावला,' 'दादला नको ग बाई,' 'सुया घे दाबन घे, असे अनेक भारूडे जनमानसात लोकप्रिय आहेत.

**बहुरूपी** — विविध प्रकारची सोंगे बेमालूपणे धारण करणाऱ्याला बहुरूपी म्हणतात. रूढार्थाने ही एक अनेक रूपे घेऊन उपजीवीका करणारी डावरी जात आहे. लोककलांकारापैकी पूर्वीच्या काळी जेव्हा गांवो गांव करमणूकीचे पर्याय मर्यादित होते. तेव्हा हे कलाकार कुणाची तरी हुबेहुब नकक्ल करून लोकांना हसवत पोलीस,फौजदार,सोंग बहुरूपी वठवतो. प्रत्येक घरी जाऊन विनोद करून पैसे किंवा धान्य मागतो.

परंतू आता चित्रपट आणि करमणुकीची साधने वाढल्याने आणि नविन पिढीला या शेतीची माहिती नसल्याने, या लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. मी लहान असताना बहुरूपी आमच्या गावात आल्यावर आम्ही मुले खेळत असताना त्याला पाहिल्या पाहिल्या आहे तो खेळ जाग्यावर आहे आसा सोडून पळ काढत असे. जर, खादे काम जर नाही केले तर आई म्हणत असे पोलीसाला पकडून नेण्यास सांगेन. त्याकाळी त्यांचा चांगलाच दरारा होता. पिंगळा पिंगळा किंवा पांगूळ ही, एक भिक्षीकऱ्याची जात आहे. सुर्यदेवाचा शरीराने पांगळा असलेला सारथी 'अरूण' याचे प्रतिनिधी म्हणून हे पिंगळे ओळखले जातात. अरूणाचे प्रतिनिधी म्हणून ते अरूणादयाच्या आधीच दारात येतात आणि 'धर्म जागो' अशी शुभकामना व्यक्त करून दान मागतात. शक्यतो हे पांगुळ पहाटेच्या वेळी झाडावर किंवा भिंतीवर बसून येणाऱ्या जाणाऱ्याकडून दान मागतात. खांदयावर घोंगडी, धोतर, डोक्यावर रंगीबेरंगी गोधडयापासून बनवलेली टोपी, काखेला झोळी, हातात घुंगराची काठी आणि कंदिल असा त्यांचा पोशाख असतो.

**वाघ्या — मुरळी** — जेजुरीचा खंडोबा ही महाराष्ट्राची लोकप्रिय लोकदेवता या लोकदेवतेचे उपासक वाघ्या मुरळीयांना लोकसंस्कृतीत, आगळे वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. खंडेरायाचे हे भक्त देवापूढे जागरण करून खंडोबाची लीला वर्णन करण्याचे काम करतात. मुरळी कपाळावर भंडारा,पदराला बांधलेली घंटी वाजवत मुरळी नाचते आणि हातात दिमडी घाटी घेवून मुठीने भंडारा उधळतात. टाळ घाटी यांचा नाद घुमतो— जागरण मोडलं जात— देवदेवतांना जागरणाला आवर्तन दिल्यावर खंडोबाची लीला वर्णन करणारी गाणी म्हटली जातात—बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे वाघ्या—मुरळी कार्यक्रमात बदल होत आहे. मुलं खंडोबाला अर्पण करण्याची प्रथा आता बंद करण्यात आलेली आहे.

**निष्कर्श** :—'लोकाची कला ती लोककला असा अर्थ स्पष्ट होतो. लोक या शब्दात पूर्ण मानवजात सामाविष्ट झाली आहे. लोककला या सामर्थ्यवान आहेत या कला समाजामध्ये प्रबोधन करू शकतात. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग व्यवहारसापेक्ष कलाविशकारांनी व्यावलेला आहे. धर्म निगडीत लोककला रंजन प्रधानतेकडे झुकल्याचे लक्षात येते. लोकनृत्य, लोकवाद्य, लोकनाटय व विधिनाटय सर्वांचे प्रत्यक्ष प्रयोगातून सादरीकरण होते म्हणून त्यांना प्रयोग लोककला असे म्हणतो.

आज धर्म निगडित लोककलांचे सादरीकरण होत असले तरी भाषांप्रमाणेच या लोककलांही परिवर्तनशील असतात. स्थळ काळानुसार त्या प्रवाही असतात. खेडयापाडयातून प्रचलित असणाऱ्या पारंपारिक विधीनाटय लोककला, प्रकारांचे जतन असणाऱ्या लोकसंस्कृतीच्या उपासकांनी केले आहे.

**शिफारणी** 1. लोककलांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शासनानेकाह योजना राबवल्या पाहिजेत. 2. कलेचे संवर्धन कर.यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ कलावंतांन होण्यासाठी, त्यांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न शासनाकडून करायला हवा. 3. विद्यापीठांमध्ये लोककला आणि ललितकला अध्यासन निर्माण करावे 4. कलाकारांना शासनाकडून मानधन दिले जाते. ते कमी असून वाढवाव.

***संदर्भ :–***

1. *डॉ–विश्वनाथ शिंदे, 'लोकसाहित्य मीमांसा', भाग पान 221*
2. *तत्रैव पान 221*
3. *तत्रैव पान 221व222*
4. *डॉ–सुरेश पाटील, सुनदा पाटील, लोकसाहित्य, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक,पान 2,*
5. *डॉ–विश्वनाथ शिंदे, 'लोकसाहित्य मीमांसा', भाग – 1 पान 225*
6. *तत्रैव, पृष्ठ 225*
7. *तत्रैव, पृष्ठ 225*
8. *डॉ. श्रीधर मोरजे, लोकसाहित्य ,क स्वतंत्र अभ्यात्रे पान 6*
9. *डॉ.रा.चिं.ढेरे,लोकसंस्कृतीची क्षितिजे, प्रास्ताविक विश्वकर्मा साहित्यालय, पुणे–*
10. *डॉ. ,कनाथ पगार, लोकसाहित्य व आधुनिक साहित्य यच ममुवि नाशिक पान 124*